मित्रमेळा आणि आसमंत रत्नागिरीच्या वतीने

# १८ ते २४ एप्रिलला राजापुरात संस्कारवर्ग

राजापूर :- येथील मित्रमेळा ग्रुप आणि आसमंत रत्नागिरीच्या वतीने १८ ते २४ एप्रिल या सात दिवसांच्या कालावधीत भटाळी शिशुविहार येथे संस्कारवर्गाचे आयोजन करण्यात आले आहे.

संस्कार वर्गाच्या पहिल्या सहा दिवस सायंकाळी ४ते ६.३० कालावधीत प्रार्थना, श्लोक, प्राणायाम, खेळ, कथाकथन, देशभक्तीपर गीते, पसायदान आणि खाऊ अशी दिनचर्या रहाणार आहे तर अंतीम दिवशी रविवारी २४ एप्रिल रोजी सकाळी ८ ते सायंकाळी ५ या कालावधीत पहिल्या सहा दिवसांच्या दैनंदिन कार्यक्रमांच्या जोडीला आसने, व दुपारी २ ते ४ स्वातंत्र्यवीर सावरकरांची चित्रफित तसेच समारोपाचा कार्यक्रम होणार आहे. समारोपाला नगराध्यक्षा मीना मालपेकर उपस्थित रहाणार आहेत.

या संस्कारवर्गात पानातून कलाकृती समीर देशपांडे, स्व-अभिव्यक्ती अजमावणे सौ. निलिमा गोरे, आसने प्रात्यक्षिक सौ.विनया शेट्ये,टाकाऊतून टिकावू प्रात्य क्षिक सौ.शेलार, रांगोळी मार्गदर्शन निलेश कुडाळी तसेच कथाकथनसाठी सौ. दाते यांचे मार्गदर्शन रहाणार आहे.

संस्कारवर्गाचे उदघाटन सोमवारी १८ एप्रिल रोजी दुपारी ३.४५ वाजता होणार आहे. या वर्गात सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांनी कात्री, दोरा, पॅड,पट्टी, बॉलपेन,पेन्सिल, शार्पनर, खोडरबर,स्केचपेन सेट, फेव्हिकॉल, नोटबुक, नॅपकिन,ताट, चमचा, पाण्याची बाटली आदी साहित्य सोबत आणावे असे आयोजकांतर्फे कळविण्यात आले आहे.